प्रशासकीय मान्यता

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात राज्य योजनेंतर्गत मंजूर झालेल्या अनुदानातून संस्थेकरिता यंत्रसामुग्री खरेदीस प्रशासकीय मान्यता.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : आयएचएन-२०१९/प्र.क्र. २४४/प्रशा-१

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९

वाचा :
1) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६
2) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.
3) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक ०७.०३.२०१८
4) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र : संवैशिवसं/ इंगाशावैमवरुना/राज्य योजना/यंसाख/१२७१३/१-म/२०१९, दिनांक ०७.०९.२०१९

शासन निर्णय :-

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेस सन २०१९-२० या आर्थिक वर्षात राज्य योजनेंतर्गत मंजूर झालेल्या अनुदानातून उपलब्ध होणाऱ्या निधीतून पुढील तक्त्यात नमूद रुपये २,९९,८०,५८२/- (रुपये दोन कोटी नव्यान्नव लक्ष ऐंशी हजार पाचशे ब्याऐंशी फक्त) ची यंत्रसामुग्री खरेदी करण्यास या शासननिर्णयान्वये पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र	यंत्राचे नांव	नग	प्रती नग किंमत (रुपये)	एकूण किंमत (रुपये)
१	बायनाकुलर लुप्स (लेंन्स, एलईडी लाईट, हेड बॅन्ड माऊंटेड)	१	१६१०००	१६१०००
२	सक्शन मशीन डबल बॉटल	१३	२२५००	२९२५००

अ.क्र	यंत्राचे नांव	नग	प्रती नग किंमत (रुपये)	एकूण किंमत (रुपये)
३	रियुजेबल कॅपॅसिटीव्ह कपलींग करंट क्वालीटी मॉनिटरिंग इलेक्ट्रोड	१	२९००००	२९००००
४	इलेक्ट्रो सर्जिकल जनरेटर सिस्टम	१	५६००००	५६००००
५	हाड्रोलिक ऑपरेशन टेबल	२	८५०००	१७००००
६	ई.सी.जी. मशीन	३	९५०००	२८५०००
७	व्हॅक्युम असिस्टेड क्लोज ड्रेसिंग विथ इरिगेशन सिस्टीम	५	२९००००	१४५००००
८	सक्शन मशीन	१५	१७३६०	२६०४००
९	एअर कंडीशनर	५	५४२००	२७१०००
१०	बबल सीपॅप (वीथ कॉप्रेसर)	४	३३०४००	१३२१६००
११	पोर्टेबल एक्सरे मशीन	२	२९९६००	५९९२००
१२	अल्ट्रासोनिक नेब्युलायझर	६	११०००	६६०००
१३	फुल्ली अॅटोमेटेड वॉशिंग मशिन वीथ ड्रायर	१	६३८००	६३८००
१४	एअर डिकंटेमिनेशन युनीट	३	२६००००	७८००००
१५	डबल डोअर रेफ्रिजरेटर	१	३२२५०	३२२५०
१६	ट्रान्सक्युटेनियस बीलीरुबीनो मिटर	१	३६५०००	३६५०००
१७	स्ट्रेचर वीथ ऑक्सिजन सिलेंडर केज वीथ रोटेटींग वील्स	१	३६०००	३६०००
१८	पेशंट वार्मिग मशिन	२	३०००००	६०००००
१९	नॉन इन्वेसिव्ह कार्डियाक आऊटपुट मॉनिटर फॉर अॅडल्ट अॅण्ड पेडियाट्रीक पेशन्ट	१	१५६८०००	१५६८०००
२०	मल्टीपॅरा मॉनिटर	६	३९०८८०	२३४५२८०
२१	वेसल सिलर सिस्टम वीथ इनबील्ट इलेक्ट्रो सर्जिकल युनीट वीथ बायपोलर टियुआरपी अंडर वॉटर सॉप्टवेअर	१	१७३६०००	१७३६०००
२२	सी-आर्म इमेज इन्टेन्सीफायर वीथ असेम्ब्ली	१	१३८३२००	१३८३२००
२३	अॅसोरटेड ईएनटी सर्जिकल इन्सटुमेंट सेटस्	१	१२१००००	१२१००००
२४	डायओड लेझर	१	१५०००००	१५०००००
२५	पल्मनरी फंक्शन टेस्ट - फोरस्ड ऑक्सिलेशन टेक्नीक	१	५०४०००	५०४०००
२६	पेल्विक रिडक्शन इन्स्ट्रुमेन्ट सेट अॅण्ड पेल्विक रिट्रॅक्टर सेट	१	२२०००००	२२०००००
२७	मिनिमल अॅसेस स्पायनल सर्जरी रिट्रॅक्टर अॅण्ड इन्स्ट्रुमेन्ट सेट	१	३५५४४८०	३५५४४८०
२८	अॅसिटॅबुलर कप रिमर इन्स्टुमेंट सेट	१	७५९९७२	७५९९७२
२९	हायड्रोलिक ओटी टेबल वीथ ऑल आर्थोपेडिक अॅण्ड स्पायनल सर्जरी अटॅचमेंटस्	१	१७५०००	१७५०००
३०	एण्डोमोटर विथ हॅण्ड पीस (कंम्प्लीट सेट)	१	५८५१०	५८५१०

अ.क्र	यंत्राचे नांव	नग	प्रती नग किंमत (रुपये)	एकूण किंमत (रुपये)
३१	आरव्हिजी सेंटर वीथ सॉप्टवेअर ॲण्ड लॅपटॉप वीथ ब्लॅक ॲण्ड व्हाईट लेझर प्रिंटर	१	२६६०००	२६६०००
३२	डेंटल चेअर युनिट	१	२९६०००	२९६०००
३३	अपेक्स लोकेटर	१	५१५८०	५१५८०
३४	डेंटल एक्सरे मशिन	१	१५५५००	१५५५००
३५	फुल्ली ॲटोमेटेड कन्टीन्युअस मॉनीटरींग ब्लड कल्चर सिस्टीम	१	२८३२०००	२८३२०००
३६	रोटी मेकिंग मशिन	१	२९५०००	२९५०००
३७	डॉट बॉल मेकिंग मशिन	१	९६५००	९६५००
३८	ट्रान्सपोर्ट व्हेन्टीलेटर	१	३०००००	३०००००
३९	नर्व्ह लोकेटर	१	९५२००	९५२००
४०	डिफिब्रिलेटर	१	२६७५००	२६७५००
४१	सिरिंज इन्फ्युजन पंप	५	३९६००	१९८०००
४२	हयुमिडिफाईड नेसल हाय फ्लो सिस्टम	१	५२९११०	५२९११०
	एकूण			२,९९,८०,५८२

अटी :-

१. सदर प्रशासकीय मान्यता संबंधित संस्थेस राज्य योजनेंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर यंत्रसामुग्री हाताळणीसाठी नव्याने पदनिर्मितीची आवश्यकता तसेच बांधकाम / विद्युतीकरणाची नाही, याबाबत संचालनालयाने व संबंधित अधिष्ठाता यांनी खातरजमा केली आहे.

३. सदर विषयी "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मध्ये नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

४. सदर यंत्रसामुग्री खरेदी विषयक प्रक्रिया "औषधे, तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे या बाबींची खरेदी हाफकिन बायो-फामास्युटीकल्स कॉपोरेशन लि. मार्फत करण्याबाबत" निर्गमित शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/ प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७ नुसार करावी.

५. सदर यंत्रसामुग्रीची आवश्यकता असल्याचे व त्याची किंमत बाजारभावापेक्षा जास्त नसल्याची खात्री संचालक (वै.शि.) तसेच संबंधित अधिष्ठाता यांनी करावी.

६. सदर यंत्रसामुग्रीची विनिर्दिष्टे व्यापक, सर्वसमावेशक असून त्यानुसार यंत्रपुरवठा करु शकणारे किमान तीन उत्पादक/पुरवठादार यांचेकडून तीन निविदा प्राप्त होऊ शकतील अशा प्रकारची आहेत, असे संचालक (वै.शि.) यांनी प्रमाणित करावे.

७. प्रस्तावित यंत्रसामुग्रीचा समावेश इतरत्र कोणत्याही प्रस्तावात अंतर्भुत केलेला नसल्याबाबत व सदर यंत्रसामुग्री संबंधित संस्थेस आवश्यक असल्याबाबत संचालकांनी खात्री करावी.

८. मुख्य यंत्र व त्यांचे सुटे भाग (Accessories) यांच्या किंमती भिन्न दर्शविणे आवश्यक राहील.

९. सदर विषयी यंत्रसामुग्री खरेदीबाबत निर्णय घेताना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानाच्या तरतूदीपेक्षा जास्त खर्च केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०. उपरोक्त शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभाग, दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ३.१.२ "किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा" या शीर्षकाखालील परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ मधील तरतूदीचे खरेदी समितीने अनुपालन करावे. त्यानुषंगाने यंत्राच्या किंमतीस आवश्यकतेनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

२. या प्रयोजनासाठी उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या यंत्रसामुग्री खरेदीसाठी येणारा खर्च खालील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक - एस ४

४२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च

०३ - वैद्यकीय शिक्षण व प्रशिक्षण संशोधन

१०५ - विषमचिकित्सा (राज्य योजनांतर्गत योजना)

(००) (३७) - शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये यांचे बळकटीकरण व श्रेणीवर्धन आणि यंत्रसामुग्री

५२ - यंत्रसामुग्री व साधनसामुग्री
(४२१० १६२९)

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग -२, अनुक्रमांक-३,

नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९११२०५४२८७६१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARUN MURLIDHAR RAO DAHALE

Digitally signed by ARUN MURLIDHARRAO DAHALE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, serialNumber=30df743755280cf26ce97ec0978235f63f80f0bc4317129bf381eb48778f2e3d, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARUN MURLIDHARRAO DAHALE
Date: 2019.09.13 15:22:11 +05'30'

(अ. मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखाकार - २ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर
२. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि., मुंबई.
३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
५. अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर
६. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर .
७. निवडनस्ती (प्रशा-१).